असा. क्र. ६१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, ऑगस्ट १६, २००१ / श्रावण २५, शके १९२३

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

## अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**—–राज्य सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करणे, त्यांचे एकत्रीकरण करणे, विलीनीकरण करणे, ते बंद करणे, इत्यादी बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने योजावयाची समयोचित उपाययोजना निर्धारित करण्यासाठी व त्याबाबत शिफारस करण्यासाठी आणि अशा उपक्रमांमधील शासनाच्या समन्याय भांडवलाच्या निर्गुंतवणुकीकरिता उपाययोजना निर्धारित करण्यासाठी व त्याबाबत शिफारस करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी अधिकार प्राप्त असे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करण्यासाठी मंडळ घटित करण्यासाठी लोकहितार्थ विशेष तरतुदी करण्यासाठी अधिनियम. ३९१––४०७

दिनांक १४ ऑगस्ट २००१ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १६ ऑगस्ट २००१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**राज्य सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करणे, त्यांचे एकत्रीकरण करणे, विलीनीकरण करणे, ते बंद करणे, इत्यादी बाबींसाठी महाराष्ट्र शासनाने योजावयाची समयोचित उपाययोजना निर्धारित करण्यासाठी व त्याबाबत शिफारस करण्यासाठी आणि अशा उपक्रमांमधील शासनाच्या समन्याय भांडवलाच्या निर्गुंतवणुकीकरिता उपाययोजना निर्धारित करण्यासाठी व त्याबाबत शिफारस करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी अधिकार प्राप्त असे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना करण्यासाठी मंडळ घटित करण्यासाठी लोकहितार्थ विशेष तरतुदी करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** संविधानाच्या भाग चार मध्ये अंतर्भूत असलेल्या राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वांमध्ये, कल्याणकारी राज्याची संकल्पना संनिविष्ट असलेल्या प्रत्येक राज्याच्या शासनाने अनुसरावयाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत; आणि ज्याअर्थी, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या अनेक न्यायनिर्णयांमध्ये, कल्याणकारी राज्य संपादन करण्यासाठी उक्त तत्त्वे मूलभूत अधिकारांना पूरक ठरणारी आहेत असे प्रतिपादन केले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र हे एक कल्याणकारी राज्य आहे आणि तसेच, ते औद्योगिकदृष्ट्या व वाणिज्यिकदृष्ट्याही प्रगत राज्य आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या सर्व मत्ता व साधनसंपत्ती याचा संपूर्ण राज्यातील लोकांच्या कल्याणासाठी व समृद्धीसाठी जास्तीत जास्त फायदा होईल अशाप्रकारे वापर करण्यात यावा, असा कल्याणकारी राज्य म्हणून महाराष्ट्र शासनाने नेहमीच प्रयत्न केला आहे ;

**आणि ज्याअर्थी,** संपूर्ण राज्याचा समतोल सामाजिक व आर्थिक विकास आणि प्रगती होत आहे आणि राज्याची संपत्ती व समृद्धी यात राज्याच्या सर्व जनतेचा समन्याय सहभाग आहे, याची निश्चिती करण्याबाबतसुद्धा शासन प्रयत्नशील आहे ;

**आणि ज्याअर्थी,** शासनाच्या असे निदर्शनास आले होते की या प्रयोजनार्थ आधीच विविध उपाय योजले असले तरीही, कल्याणकारी राज्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहायक म्हणून अनेक वर्षांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या विविध राज्य सार्वजनिक उपक्रमांची कार्यात्मक आणि आर्थिक वर्धनक्षमता दिवसेंदिवस घसरत आहे, त्यामुळे केवळ राज्याच्या साधनसंपत्तीवरच ताण पडतो आहे असे नाही तर, या राज्य सार्वजनिक उपक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्यावरही प्रतिकूल परिणाम होत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या मूलभूत विकासासाठी स्थापन करण्यात आलेले हे राज्य सार्वजनिक उपक्रम, राज्यात वस्तू व सेवा उपलब्ध करून देणे सुकर करण्यासाठी आणि राज्यातील सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या प्रचालनासाठी सतत परिणामकारक भूमिका पार पाडणारे आणि आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम ठरावे याची खात्री करून घेणे ही राज्याची चिंतेची बाब होती ;

**आणि ज्याअर्थी,** अशा राज्य सार्वजनिक उपक्रमांना कडक आर्थिक शिस्तीचे पालन करणे शक्य व्हावे यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम आणि कार्यचालनात्मक दृष्टीने सुरक्षित होण्यासाठी त्यांचे पुनरुज्जीवन करणे किंवा पुनः संघटन करणे आणि पुनर्रचना करणे शक्य व्हावे यासाठी शासनाला व त्याचप्रमाणे अशा राज्य सार्वजनिक उपक्रमांना अनिवार्य सल्ला व सहाय्य देण्यासाठी तज्ज्ञ मंडळाची सेवा उपलब्ध करण्याच्या मार्गाने शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक होते;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी विशेष तरतुदी करणे आवश्यक वाटले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १८ नोव्हेंबर २००० रोजी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अध्यादेश, २००० हा प्रख्यापित केला होता ; २००० चा महा. अध्या. २८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम, २००० असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १८ नोव्हेंबर २००० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, — व्याख्या.

(क) " सहायकारी अभिकरण " याचा अर्थ, मंडळाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केला असेल असा, चौकशी करण्याच्या बाबतीत, किंवा योजना तयार करण्यासाठी सहाय्य करण्याकरिता आपले अभिकरण म्हणून नियुक्त केलेला कोणताही राज्य सार्वजनिक उपक्रम, खाजगी क्षेत्रातील अभिकरण किंवा इतर कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा निकाय, असा आहे ;

(ख) " मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेले, " महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ " असा आहे ;

(ग) " अध्यक्षपदीय व्यक्ती " याचा अर्थ, मंडळाच्या अध्यक्ष पदावरील व्यक्ती, असा आहे ;

(घ) " विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा कोणताही विभाग, असा आहे ;

(ङ) "शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " उच्च न्यायालय " याचा अर्थ, मुंबई उच्च न्यायालय, असा आहे ;

(छ) " व्यवस्थापन " याचा अर्थ, उक्त उपक्रमाच्या कार्याच्या व्यवस्थापनासाठी जबाबदार असलेले कोणत्याही राज्य सार्वजनिक उपक्रमाचे संचालक मंडळ, नियामक मंडळ, व्यवस्थापन समिती किंवा प्राधिकारी मंडळ, असा आहे ;

(ज) " सदस्य " याचा अर्थ, मंडळाचा सदस्य, असा आहे आणि त्यामध्ये त्याच्या अध्यक्षपदीय व्यक्तीचासुद्धा समावेश आहे ;

(झ) " दिवसांची संख्या " याचा अर्थ, दिनदर्शिकेनुसार असलेले सर्व दिवस, असा आहे आणि त्यात सर्व सुट्ट्यांचा देखील समावेश आहे ;

(ञ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेला, असा आहे ;

(ट) '' रिझर्व्ह बँक '' याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ याच्या कलम ३ अन्वये घटित केलेली भारतीय रिझर्व्ह बँक असा आहे ; १९३४ चा २.

(ठ) '' निर्देशिलेला उपक्रम '' याचा अर्थ, ज्याच्या बाबतीत शासनाकडून मंडळाकडे निर्देश करण्यात आला आहे, असा कोणताही राज्य सार्वजनिक उपक्रम, असा आहे आणि तो, मंजूर केलेल्या योजना, मंडळाचे समाधान होईल अशा प्रकारे पूर्ण होईपर्यंत किंवा मंडळाकडून विसर्जित करण्यात येईपर्यंत, असा निर्देशिलेला उपक्रम म्हणून राहील ;

(ड) '' मान्यताप्राप्त कामगार संघ किंवा अधिकारी संघटना '' याचा अर्थ, संबद्ध अधिनियमांच्या तरतुदींनुसार ज्यास मान्यता मिळालेली आहे, असा राज्य उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांचा किंवा अधिकाऱ्यांचा कोणताही संघ किंवा संघटना, असा आहे ;

(ढ) '' अनुसूची '' याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ण) '' अनुसूचित बँक '' याचा अर्थ, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ याच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये त्या त्या वेळी समावेश करण्यात येईल, अशी बँक, असा आहे ; १९३४ चा २.

(त) '' राज्य '' याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य असा आहे ;

(थ) '' राज्य सार्वजनिक उपक्रम '' याचा अर्थ, ज्यात शासनाचा समन्याय किंवा अधिमान्य भांडवल म्हणून ५० टक्के किंवा अधिक वाटा आहे किंवा ज्यात शासनाचे भरीव आर्थिक हितसंबंध आहेत आणि जो या अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये समाविष्ट केलेला आहे अशा कोणत्याही दुय्यम निकायासह कोणतेही निकाय किंवा जो कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन झालेला असो किंवा नसो किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० या अन्वये नोंदणी झालेली असो किंवा नसो, असे कोणतेही निकाय किंवा कोणत्याही राज्य अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये संस्थापित झालेला उपक्रम, असा आहे ; १९५६ चा १. १८६० चा २१. १९६१ चा महा. २४. १९५० चा मुंबई २९.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न देण्यात आलेले कोणतेही शब्द व शब्दप्रयोग असल्यास, कंपनी अधिनियम, १९५६, औद्योगिक (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० आणि इतर राज्य अधिनियम व या अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये नमूद करण्यात आलेले विविध राज्य सार्वजनिक उपक्रम ज्या संविधी अन्वये विधिसंस्थापित करण्यात आले असतील असे संविधी यात त्यांना जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल. १९५६ चा १. १९५१ चा ६५. १९६१ चा महा. २४. १९५० चा मुंबई २९.

(३) कोणताही इतर अधिनियम किंवा त्याची कोणतीही तरतूद यांचा या अधिनियमात केलेला निर्देश हा, ज्या क्षेत्रात असा अधिनियम किंवा अशी तरतूद अंमलात नसेल अशा क्षेत्राच्या बाबतीत, त्या क्षेत्रामध्ये अंमलात असलेल्या कोणत्याही तदनुरूप कायद्याचा, कोणत्याही असल्यास, किंवा तदनुरूप कायद्याच्या संबद्ध तरतुदीचा, निर्देश असल्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल.

## प्रकरण दोन

### महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ.

मंडळाची स्थापना व संबंधित बाबी.

३. (१) शासन, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकानंतर लगेच परंतु त्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा नंतरचा नसेल अशा कालावधीत **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ या नावाचे मंडळ स्थापन करील.

(२) (क) मंडळ, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या किंवा नेमून देण्यात आलेल्या असतील अशा अधिकारिता व अधिकार यांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडील.

(ख) मंडळ, एक अध्यक्षपदीय व्यक्ती व दोन सदस्य यांचे मिळून बनलेले असेल. अध्यक्षपदीय व्यक्तीची नियुक्ती शासन करील. मंडळाच्या इतर दोन सदस्यांची नियुक्ती देखील अध्यक्षपदीय व्यक्तीशी पूर्वविचारविनिमय करून, शासनाकडून करण्यात येईल. कार्यभारामुळे मंडळाचे अतिरिक्त खंडपीठ स्थापन करणे आवश्यक असेल तर अध्यक्षपदीय व्यक्ती, विनिर्दिष्ट कालावधीसाठी (तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा) अतिरिक्त सदस्य नियुक्त करण्याबाबत शासनास विनंती करू शकेल.

(ग) ज्यांना पंधरा वर्षांपेक्षा कमी नाही इतका सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्रातील व्यावसायिक अनुभव असेल आणि ज्यांना प्रशासन, बँकिंग, व्यवस्थापन, वित्त, लेखा, विधि, कामगारविषयक बाबी, कंपनी कार्य या क्षेत्रांतील विशेष ज्ञान असेल किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील विशेष अनुभव असेल किंवा शासनाच्या मते मंडळास उपयुक्त ठरेल अशा प्रकारचे विशेष ज्ञान असेल, अशी पात्रता, सचोटी व निष्ठा असेल अशा व्यक्ती, या मंडळाचा अध्यक्षपदीय व्यक्ती व सदस्य असतील.

अध्यक्षपदीय व्यक्ती व इतर सदस्य यांचा पदावधी, सेवाशर्ती, इत्यादी.

४. (१) कोणत्याही व्यक्तीची, मंडळाची अध्यक्षपदीय व्यक्ती किंवा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यापूर्वी, ती व्यक्ती अशी अध्यक्षपदीय व्यक्ती किंवा सदस्य म्हणून कार्य करताना तिच्या कार्याला बाधा पोहचण्याचा संभव आहे असा तिचा वित्तीय किंवा इतर हितसंबंध नाही या बाबतीत शासन स्वतःची खात्री पटवून घेईल :

परंतु, कोणतीही व्यक्ती, तिने वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केल्यानंतर अध्यक्षपदीय व्यक्ती किंवा सदस्य म्हणून पद धारण करणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या सदस्यास,—

(क) आपल्या सहीनिशी राज्य शासनास उद्देशून कोणत्याही वेळी आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल ; किंवा

(ख) कलम ५ च्या तरतुदींनुसार त्याच्या पदावरून काढून टाकता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये अध्यक्षपदीय व्यक्तीने किंवा इतर कोणत्याही सदस्याने राजीनामा दिल्याच्या कारणावरून किंवा त्याला काढून टाकल्याच्या कारणावरून किंवा अन्य कारणावरून एखादे पद रिक्त झाल्यास असे पद शासनाकडून नव्याने नियुक्ती करून भरण्यात येईल.

(४) अध्यक्षपदीय व्यक्तीचे पद तिचा मृत्यू झाल्याने, तिने राजीनामा दिल्याने किंवा अन्य कारणाने रिक्त झाल्यास अशा प्रसंगी, राज्य शासन अधिसूचनेद्वारे या बाबतीत प्राधिकृत करील असा एखादा सदस्य, असे रिक्त पद भरण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नियुक्त करण्यात आलेली नवीन अध्यक्षपदीय व्यक्ती तिचे पद धारण करील त्या दिनांकापर्यंत, अध्यक्षपदीय व्यक्ती म्हणून कार्य करील.

(५) अध्यक्षपदीय व्यक्ती अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाल्यास, ती आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी रुजू होण्याच्या दिनांकापर्यंत, या बाबतीत अध्यक्षपदीय व्यक्ती, लेखी प्राधिकृत करील असा मंडळाचा एखादा सदस्य, अध्यक्षाची कर्तव्ये पार पाडील.

(६) अध्यक्षपदीय व्यक्ती व सदस्य यांना प्रदेय असलेले व्यावसायिक शुल्क व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती शासन आदेशाद्वारे निर्धारित करील :

परंतु, अध्यक्षपदीय व्यक्ती किंवा कोणताही सदस्य यास देय असलेले व्यावसायिक शुल्क व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती यांमध्ये, त्यांच्या नियुक्तीनंतर, त्याला अहितकारक होतील असे बदल केले जाणार नाहीत.

(७) अध्यक्षपदीय व्यक्ती व प्रत्येक इतर सदस्य आपले पद ग्रहण करण्यापूर्वी अनुसूची दोन मध्ये दिलेल्या नमुन्यात एकनिष्ठतेचे व गुप्ततेचे प्रतिज्ञापन देतील.

(८) अध्यक्षपदीय व्यक्ती किंवा इतर कोणताही सदस्य याने असे पद धारण करणे समाप्त केल्यानंतर, ज्याच्या संबंधातील कोणतीही गोष्ट मंडळासमोरील विचारार्थ विषय असेल अशा इतर निर्देशलेल्या उपक्रमात, ती, असे पद धारण करणे समाप्त केल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीत कोणतीही नेमणूक स्वीकारणार नाही किंवा त्याच्या व्यवस्थापनात किंवा प्रशासनात सहभागी होणार नाही.

(९) मंडळाची अध्यक्षपदीय व्यक्ती व सदस्य यांचा पदावधी प्रारंभी तीन वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीसाठी असेल. राज्य सार्वजनिक उपक्रमांची पुनर्रचना, इत्यादीचे काम शासनाचे समाधान होईल अशा प्रकारे पूर्ण होईपर्यंत शासनाच्या इच्छेनुसार पोट-कलम (१) च्या परंतुकास अधीन राहून, शासनाला वेळोवेळी हा पदावधी वाढविता येईल. मंडळाची अध्यक्षपदीय व्यक्ती व सदस्य, यांना त्यांच्या पदावधीमध्ये पोट-कलम (१) च्या तरतुदींशी सुसंगत अशी त्यांच्या पसंतीची इतर कोणतीही कामे, त्यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी किंवा, अन्यथा, पुढे चालू ठेवता येतील.

विशिष्ट परिस्थितीत सदस्यांना पदावरून काढून टाकणे.

५. शासनाला, जो सदस्य,—

(क) नादार म्हणून न्यायनिर्णीत झालेला असेल; किंवा

(ख) शासनाच्या मते ज्यामध्ये नैतिक अधोगतीचा समावेश असेल अशा एखाद्या अपराधासाठी सिद्धापराधी ठरलेला असेल ; किंवा

(ग) सदस्य म्हणून राहण्यास शारिरीक किंवा मानसिकदृष्ट्या असमर्थ असेल ; किंवा

(घ) सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या कार्यावर बाधक रीतीने परिणाम करतील असे वित्तीय किंवा इतर हितसंबंध त्याने संपादित केले असतील ; किंवा

(ङ) आपल्या पदाचा त्याने अशाप्रकारे दुरुपयोग केला असेल की, तो पदावर असणे जनहिताला बाधक ठरेल,

अशा कोणत्याही सदस्याला पदावरून काढून टाकता येईल.

६. (१) मंडळाचे काम कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारी शासन मंडळाला पुरवील. मंडळाची मोहोर लावून नोटिसा पाठविण्यासह मंडळाची प्रशासकीय कार्ये पार पाडण्यासाठी, अध्यक्षपदीय व्यक्ती ठरवील असे आवश्यक अधिकार अधिकाऱ्यांना देता येतील. मंडळाचे अधिकारी व इतर कर्मचारी.

(२) मंडळाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवाशर्ती विहित केल्याप्रमाणे असतील :

परंतु, असे अधिकारी किंवा इतर कर्मचारी कामाला प्रारंभ करण्यापूर्वी अनुसूची दोन मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये एकनिष्ठतेचे व गुप्ततेचे प्रतिज्ञापन करतील.

७. सदस्यांना व सहायकारी अभिकरणांना, देय असलेले व्यावसायिक शुल्क व भत्ते आणि प्रशासकीय खर्चासहित मंडळाच्या तज्ञांना व अधिकाऱ्यांना आणि इतर कर्मचाऱ्यांना व त्यांच्या संबंधात देय असलेले व्यावसायिक शुल्क, वेतने, भत्ते व निवृत्तिवेतन, इत्यादी राज्याच्या एकत्रीत निधीतून भागविण्यात येतील. राज्याच्या एकत्रीकृत निधीतून भागवावयाचे शुल्क, इत्यादी.

८. मंडळाचे कोणतेही पद रिक्त असणे किंवा मंडळ घटित करण्यात कोणताही दोष असणे किंवा मंडळाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नेमणुकीत कोणताही दोष असणे याच केवळ कारणांवरून मंडळाच्या किंवा, यथास्थिति, त्याच्या सदस्याच्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाहीस हरकत घेण्यात येणार नाही. रिक्त पदे, इत्यादीमुळे मंडळाची कार्यवाही विधिअग्राह्य, न ठरणे.

९. मंडळाची अध्यक्षपदीय व्यक्ती व इतर सदस्य आणि अधिकारी व अन्य कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. (१८६० चा ४५.) मंडळाचे सदस्य व कर्मचारीवर्ग लोकसेवक असणे.

१०. (१) मंडळाची अधिकारिता, अधिकार व प्राधिकार, त्याच्या एकल खंडपीठाकडून वापरण्यात येतील. मंडळाचे खंडपीठ घटित करणे.

(२) खंडपीठ अध्यक्षपदीय व्यक्तीकडून घटित करण्यात येईल आणि ते, दोन सदस्यांचे मिळून बनलेले असेल.

(३) खंडपीठाच्या सदस्यांमध्ये कोणत्याही मुद्द्याबाबत मतभेद असतील तर, ज्याबाबत त्यांचे मतभेद झाले असतील असा मुद्दा ते नमूद करतील आणि त्याबाबत मंडळाच्या अध्यक्षपदीय व्यक्तीकडे निर्देश करतील. ती व्यक्ती अशा मुद्द्याबाबत स्वतः सुनावणी करील. अशा मुद्याचा निर्णय अध्यक्षपदीय व्यक्तीच्या मतानुसार होईल आणि तिचे मत हे मंडळाचे अंतिम मत असेल.

११. (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, मंडळाला पुढील बाबी विनियमित करण्याचे अधिकार असतील,— मंडळाची कार्यपद्धती.

(क) मंडळाची कामकाज चालविण्याची कार्यपद्धती ;

(ख) खंडपीठांच्या बैठकी घेण्यात यावयाच्या ठिकाणांसह खंडपीठाची कार्यपद्धती ; आणि

(ग) मंडळ विनिर्दिष्ट करील असे अधिकार किंवा कार्ये एका किंवा अधिक सदस्यांकडे सोपविणे.

(२) मंडळास, या अधिनियमाखालील कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनासाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला पुढील बाबतीत न्यायचौकशी करताना जे अधिकार असतात ते सर्व अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) कोणत्याही साक्षीदारास समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) पुरावा म्हणून ग्राह्य मानता येईल असे दस्तऐवज किंवा इतर गोष्टी शोधून काढणे व दाखल करणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागून घेणे ;

(ङ) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी कोणताही राजादेश काढणे ;

(च) विहित करण्यात येईल अशी कोणतीही इतर बाब.

मंडळापुढील कार्यवाही न्यायिक कार्यवाही असणे.

**१२.** मंडळास, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १९५ व प्रकरण २६ च्या प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्यापुढील कार्यवाहीस, भारतीय दंड संहिता, १८६० याची कलमे १९३ व २२८ च्या अर्थानुसार आणि उक्त संहितेच्या कलम १९६ च्या प्रयोजनांसाठी न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. १९७४ चा २. १८६० चा ४५.

## प्रकरण तीन

## संदर्भ, चौकशी आणि योजना

मंडळाकडे निर्देश करण्याचा शासनाचा अधिकार.

**१३.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, मंडळाकडे निर्देश करण्याचा प्राधिकार फक्त शासनाकडे निहित केला आहे.

(२) कोणत्याही राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या संबंधात,—

(एक) शासनाला अशा राज्य सार्वजनिक उपक्रमांमधून त्याचे स्वामित्व किंवा व्यवस्थापन परत मागे घ्यायचे असेल आणि स्वामित्व किंवा व्यवस्थापन यामधील आपले नियंत्रण काढून घ्यायची त्याची इच्छा असेल ; किंवा

(दोन) अशा राज्य सार्वजनिक उपक्रमांची आर्थिक स्थिती समाधानकारक नाही आणि तातडीच्या सुधारात्मक उपाययोजनांची आवश्यकता आहे असे लेखी नमूद केलेल्या कारणांसाठी शासनाचे मत असेल ; किंवा

(तीन) अशा राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या आर्थिक स्थितीमध्ये, किंवा व्यवहारांमध्ये आणि व्यवस्थापनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी दोन किंवा अधिक उपक्रम किंवा त्यांचे गौण उपक्रम यांचे विलीनीकरण करणे शक्य आहे असे शासनाचे मत असेल,

अशा बाबतीत, शासनास त्यासंबंधात मंडळाकडे निर्देश करता येईल.

(३) राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या आर्थिक स्थितीबाबत, तातडीने तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाची गरज आहे किंवा त्याची आर्थिक स्थिती बळकट नाही, आणि त्यात सुधारणा करावयाची गरज आहे किंवा ती पुनरुज्जीवनाच्या पलीकडे गेली आहे असे अशा उपक्रमाच्या व्यवस्थापनाचे मत असेल, अशा बाबतीत, मंडळाकडे निर्देश करण्याची राज्य शासनास विनंती करणारा ठराव अशा उपक्रमाच्या व्यवस्थापनास संमत करता येईल. अशा प्रकरणी, शासन, असा ठराव मिळाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या कालावधीत मंडळाकडे निर्देश करील :

१९८६ चा १. परंतु असे की, आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष तरतुदी) अधिनियम, १९८५ याच्या तरतुदींचा वापर करावा लागत असेल किंवा त्या लागू होतील अशा बाबतीत शासनाकडून मंडळाकडे असा कोणताही निर्देश करण्यात येणार नाही किंवा राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या व्यवस्थापनाकडून असा कोणताही ठराव संमत करण्यात येणार नाही.

(४) शासनाने मंडळाकडे केलेला निर्देश शासनाकडून मागे घेण्यात येणार नाही.

**१४.** (१) कलम १३ अन्वये कोणत्याही राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या संबंधात (यात यानंतर ज्याचा निर्देश "निर्देशिलेला उपक्रम" असा केला आहे), शासनाकडून निर्देश मिळाल्यावर, मंडळ अशा उपक्रमाची आर्थिक स्थिती निश्चित करून घेण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी करील. राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या कामकाजाच्या संबंधात शासनाकडून करण्यात आलेल्या निर्देशाची मंडळाने चौकशी करणे.

(२) पोट-कलम (१) खालील चौकशी शीघ्रतेने निकालात काढण्यासाठी मंडळाला तसे करणे आवश्यक वाटल्यास किंवा इष्ट वाटल्यास, मंडळास, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा बाबीसंबंधात चौकशी करण्यासाठी आणि अहवाल तयार करण्यासाठी, मंडळ निर्धारित करील अशा अटी व शर्तींवर, सहायकारी अभिकरण नियुक्त करता येईल.

(३) मंडळ, किंवा यथास्थिति, सहायक अभिकरण, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि चौकशीस प्रारंभ झाल्यापासून साठ दिवसांच्या आत व कुठल्याही परिस्थितीत नव्वद दिवसांपेक्षा नंतरचा नसेल अशा कालावधीत आपली चौकशी पूर्ण करील.

**१५.** (१) मंडळास, कलम १४ खालील चौकशी केल्यानंतर आणि प्रकरणासंबंधातील सर्व वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेतल्यानंतर, आणि निर्देशिलेल्या उपक्रमाचे व्यवस्थापन तसेच मंडळास योग्य वाटतील अशा इतर व्यक्ती व पक्ष यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, वाजवी वेळेत प्रतिकूल वित्तीय कामगिरी प्रत्यावर्तित करणे अशा निर्देशिलेल्या उपक्रमाला शक्य होईल का हे ठरविता येईल. चौकशी पूर्ण झाल्यावर यथोचित आदेश काढण्याचा मंडळाचा अधिकार.

(२) वाजवी वेळेत अशा निर्देशिलेल्या उपक्रमासाठी प्रतिकूल वित्तीय कामगिरी प्रत्यावर्तित करणे शक्य आहे असे, मंडळाने पोट-कलम (१) खाली ठरविल्यास, ते अशा उपक्रमासंबंधातील, अहवालात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा मार्गदर्शक तत्त्वांसह आपला लेखी अहवाल, शासनाकडे आणि उक्त निर्देशित उपक्रमाकडे पाठवील. त्यानंतर, ज्या अन्वये तो उपक्रम घटित केला असेल किंवा, यथास्थिति, नोंदला असेल, अशा संबंधित कायद्याच्या तरतुदींस अधीन राहून, त्याच्या कालबद्ध पुनरुज्जीवन कार्यक्रमासाठी, मंडळाने दिलेली मार्गदर्शक तत्त्वे अनुसरण्यासाठी अशा उपक्रमांना निदेश देणे हे शासनाचे अवश्यकर्तव्य राहील.

(३) निर्देशिलेल्या उपक्रमाने पोट-कलम (२) मधील अहवालात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्यास किंवा उक्त मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून वित्तीय कामगिरी प्रत्यावर्तित करण्यात त्या निर्देशिलेल्या उपक्रमाने कसूर केल्यास, मंडळास स्वतःहून अशा अहवालाचे पुनर्विलोकन करता येईल आणि शासनास सादर करण्यासाठी, अशा उपक्रमाच्या संबंधात एक नवीन अहवाल तयार करता येईल.

## प्रकरण चार

## योजनेचे कार्यान्वयन

योजना तयार करणे आणि त्यांना मजुरी देणे.

१६. (१) कोणत्याही निर्देशिलेल्या उपक्रमांच्या संबंधात कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये अहवाल तयार केल्यावर आणि मंडळाकडून घालून देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कालमर्यादेच्या चौकटीत स्वतःचे पुनःरुज्जीवन करण्यात अशा उपक्रमाने कसूर केल्यास, मंडळ, ते निर्धारित करील अशा अटी व शर्तींवर अशा सहायकारी अभिकरणास किंवा यासंबंधात मंडळाने नियुक्त केलेल्या कोणत्याही इतर अभिकरणास शक्य तितक्या शीघ्रतेने, आणि सामान्यपणे असा आदेश मिळाल्यापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत अशा निर्देशिलेल्या उपक्रमासंबंधात, पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक उपाययोजनांची तरतूद करणारी योजना तयार करण्याचे आदेश देईल, त्या उपाययोजना अशा :—

(क) शासनाने कोणत्याही स्वरूपातील वित्तीय सहाय्य न देता निर्देशिलेल्या उपक्रमाची वित्तीय पुनर्रचना ;

(ख) कोणत्याही व्यक्तीसाठी अथवा खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्र संघटनेसाठी निर्देशिलेल्या उपक्रमात शासकीय भाग-भांडवलाची किंवा कोणत्याही स्वरूपात धारण केलेल्या शासकीय हिश्श्याची किंवा आर्थिक हितसंबंधाची अंशतः किंवा पूर्णपणे निर्गुंतवणूक ;

(ग) यात यापुढे "हस्तांतरिती निकाय" असा निर्देश केलेल्या इतर कोणत्याही उपक्रमाशी निर्देशिलेल्या उपक्रमांचे एकत्रीकरण ;

(घ) निर्देशिलेल्या उपक्रमाच्या कोणत्याही भागाचे किंवा संपूर्ण उपक्रमाचे व्यवहार अथवा कार्यवाही बंद करणे ;

(ङ) निर्देशिलेल्या उपक्रमाच्या मत्तेची अंशतः किंवा पूर्णतः विक्री ; आणि

(च) यथोचित असतील अशा इतर प्रतिबंधात्मक, स्थिति सुधारविषयक, आनुषंगिक, परिणामरूप, पूरक आणि सुधारात्मक उपाययोजना :

परंतु, व्यवस्थापकीय कर्मचारीवर्ग, पर्यवेक्षी कर्मचारीवृंद आणि श्रमिक यांचे पुनःसंघटन असल्यास, ते कायद्यास अनुसरून करण्यात येईल.

(२) सहायकारी अभिकरणाकडून तयार करण्यात आलेल्या योजनेची मंडळाकडून तपासणी करण्यात येईल आणि त्यात मंडळाने सुधारणा सुचविली असल्यास अशा सुधारणेसह, योजनेच्या मसुद्याची एक प्रत मंडळाकडून, शासनास, निर्देशिलेल्या उपक्रमास, सहायकारी अभिकरणास मान्यताप्राप्त कर्मचारी संघास किंवा अधिकारी संघटनेस आणि एकत्रीकरणाच्या प्रकरणात, संबंधित हस्तांतरिती निकायाकडेही पाठवण्यात येईल.

(३) (क) पोट-कलम (२) खाली ज्या व्यक्तींना किंवा निकायांना योजनेच्या मसुद्याची प्रत पाठविण्यात आली असेल, त्यांच्याकडून जर काही सूचना प्राप्त झाल्या असतील तर मंडळ त्या विचारात घेईल आणि योजनेच्या मसुद्यामध्ये योग्य आणि आवश्यक वाटतील अशा सुधारणा करील ; आणि त्यानंतर योजनेस अंतिम स्वरूप देईल.

(ख) मंडळ, तद्नंतर त्याने मंजुरी दिलेली अशी अंतिम योजना शासनाकडे आणि संबंधित निर्देशिलेल्या उपक्रमाकडे पाठवील. त्यानंतर, संबंधित निर्देशिलेल्या उपक्रमास त्या त्या वेळी अंमलात असलेल्या संबंधित कायद्यांना अनुसरून आणि अधीन राहून, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचा निदेश देणे हे शासनाचे अवश्य कर्तव्य असेल.

(४) मंडळ, शासनाच्या वतीने मंजूर योजनेच्या कार्यान्वयनाचे नियतकालिक संनियंत्रण करू शकेल. मंडळाला, मंजूर योजनेत विनिर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांच्या अनुपालनाची पडताळणी करण्यासाठी निर्देशिलेल्या उपक्रमाकडून कोणतीही नियतकालिक माहिती मागवता येईल आणि निर्देशिलेला उपक्रम अशी सर्व माहिती तत्परतेने मंडळास देईल.

**१७.** मंडळाचे, जर असे मत असेल की, निर्देशिलेला उपक्रम किंवा धनको किंवा भागधारक यांच्या हिताच्या किंवा लोकहिताच्या दृष्टीने कोणताही निदेश देणे आवश्यक आहे, तर ते निर्देशिलेल्या उपक्रमास आपल्या कोणत्याही मत्ता मंडळाच्या संमतीखेरीज, पुढे दिलेल्या कालावधीमध्ये, निकालात काढू नये असे निदेश देण्याची शिफारस शासनाला करील आणि शासन त्यावर निदेश देईल :– *मत्ता निकालात न काढण्याचा निदेश.*

(क) कलम १६ अन्वये योजना तयार करण्याच्या आणि ती विचारात घेण्याचा कालावधी ; आणि

(ख) कलम १८ अन्वये कंपनीचे समापन किंवा विघटन करण्यासाठी, मंडळाकडून मत नोंदवण्यास प्रारंभ करण्यात आल्याच्या कालावधीपासून समापनासंबंधीच्या किंवा विघटनासंबंधीच्या कार्यवाहीस प्रारंभ होईपर्यंतचा कालावधी.

**१८.** कलम १४ अन्वये चौकशी केल्यानंतर आणि संबद्ध वस्तुस्थिती व परिस्थिती विचारात घेतल्यानंतर आणि सर्व संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, उक्त निर्देशिलेला उपक्रम भविष्यकाळात वर्धनक्षम होण्याची शक्यता नाही आणि निर्देशिलेला उपक्रम समापित करण्यात आला पाहिजे किंवा, यथास्थिति त्याचे विघटन केले पाहिजे, असे मंडळाचे मत झाले असेल तर, मंडळाला आपले मत नमूद करून ते शासनाला कळविता येईल आणि त्यानंतर शासन–– *निर्देशिलेल्या उपक्रमाचे समापन करणे.*

१९५६ चा १. (क) जर ती कंपनी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी करण्यात आलेली असेल ; किंवा

(ख) जर तो राज्य किंवा केंद्रीय कायद्याअन्वये घटित केलेला उपक्रम असेल ;

१९५६ चा १. तर कंपनी अधिनियम, १९५६ च्या तरतुदींनुसार समापनाची कार्यवाही सुरू करण्यासाठी उच्च न्यायालयाकडे निर्देश करील किंवा, यथास्थिति, असा निर्देशिलेला उपक्रम ज्या कायद्याअन्वये घटित करण्यात आला असेल त्याच्या संबद्ध तरतुदींनुसार त्याचे विघटन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करील.

सहायकारी अभिकरणाने संपूर्ण वस्तुस्थिती, इत्यादी तयार करणे.

१९. या अधिनियमाखालील मंडळाची कार्ये योग्यरीतीने पार पाडण्यासाठी परिस्थितीनुसार आवश्यकता भासल्यास, मंडळाला कोणत्याही सहायकारी अभिकरणामार्फत पुढील बाबी तयार करविता येतील :—

(क) राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या बाबतीत,—

(एक) कोणत्याही स्वरूपातील सर्व मत्ता व दायित्वे ;

(दोन) सर्व लेखा पुस्तके, नोंदवह्या, नकाशे, आराखडे, अभिलेख, मालमत्तेच्या हक्कासंबंधीचे किंवा मालकीसंबंधीचे दस्तऐवज आणि त्याच्याशी संबंधित कोणत्याही स्वरूपाचे इतर सर्व दस्तऐवज ;

यांची संपूर्ण वस्तुसूची ;

(ख) भागधारकांची सूची व सूचीमध्ये प्रतिभूत केलेले धनको आणि प्रतिभूत न केलेले धनको, स्वतंत्रपणे दर्शविणारी धनकोंची सूची ;

(ग) संपूर्ण राज्य सार्वजनिक उपक्रमाच्या किंवा त्याच्या भागाच्या विक्रीसाठी राखीव किंमत ठरविण्याकरिता किंवा भाग विनिमय गुणोत्तर निश्चित करण्यासाठी भाग व मत्ता यांच्या बाबतीतील मूल्यांकन अहवाल ;

(घ) राखीव किंमत, किंवा भाग विनिमय गुणोत्तर यांचा अंदाज ; आणि

(ङ) अद्ययावत लेखापरिक्षित लेखे उपलब्ध नसतील तर, प्रपत्र लेखे.

## प्रकरण पाच

## अपकार्य कार्यवाही, अपीले व संकीर्ण

अपकार्य कार्यवाही.

२०. कोणत्याही योजनेचे किंवा प्रस्तावाचे परिनिरीक्षण, चौकशी किंवा कार्यान्वयन करीत असताना, मंडळाला असे आढळून आले की, निर्देशिलेल्या उपक्रमाच्या किंवा त्याच्या कोणत्याही युनिटाच्या प्रचालनामध्ये, रचनेमध्ये किंवा त्याच्या व्यवस्थापनामध्ये सहभागी झालेल्या निर्देशिलेल्या उपक्रमाचा कोणताही माजी किंवा विद्यमान संचालक, व्यवस्थापक किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यासह, कोणतीही व्यक्ती,—

(क) तिने निर्देशिलेल्या उपक्रमाच्या कोणत्याही रकमेचा किंवा मालमत्तेचा गैरवापर केलेला आहे किंवा ती धारण केलेली आहे, किंवा ती त्यासाठी उत्तरदायी आहे किंवा तिला जबाबदार धरलेले आहे ; किंवा

(ख) निर्देशिलेल्या उपक्रमाच्या संबंधात कोणत्याही अपकार्याबद्दल, दुष्कार्याबद्दल किंवा प्रमादाबद्दल किंवा विश्वासघात केल्याबद्दल ती दोषी ठरली आहे ;

असे दिसून आले असेल तर, मंडळ आपले निष्कर्ष योग्य त्या कार्यवाहीसाठी शासनाला कळवील.

अधिकारितेस रोध.

२१. या अधिनियमाखाली शासनाने संमत केलेला कोणताही निदेश किंवा आदेश उच्च न्यायालयाखेरीज अपीलयोग्य असणार नाही आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये निर्णय करण्याचा अधिकार प्रदान केलेल्या मंडळाच्या कोणत्याही बाबीसंबंधात इतर कोणत्याही न्यायालयास, अधिकारिता असणार नाही आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराच्या अनुरोधाने मंडळाने किंवा शासनाने केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कारवाईच्या बाबतीत कोणत्याही न्यायालयाला किंवा इतर प्राधिकरणाला निषेधाज्ञा मंजूर करता येणार नाही.

२२. मंडळास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, मंडळाच्या कोणत्याही सदस्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे किंवा सहायकारी अभिकरणाकडे, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, कोणत्याही असल्यास, शर्तींना व मर्यादांना अधीन राहून, या अधिनियमाखालील त्यास योग्य वाटतील असे अधिकार व कर्तव्ये (कलम १४ चे पोट कलम (२), कलम १५, कलम १६, कलम १७, कलम १८ व कलम २० यांच्याखालील अधिकार व कर्तव्ये वगळून) सोपविता येतील. अधिकारांचे प्रत्यायोजन.

२३. या अधिनियमास अनुसरुन सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेल्या किंवा होण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल या अधिनियमाखालील कोणतेही कार्य पार पाडणारे मंडळ किंवा मंडळाचा अध्यक्ष किंवा कोणताही अन्य सदस्य, अधिकारी किंवा अन्य कर्मचारी किंवा सहायकारी अभिकरण किंवा या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी मंडळाने प्राधिकृत केलेली इतर कोणतीही व्यक्ती यांविरुद्ध कोणताही वाद किंवा अन्य कोणतीही कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.

२४. (१) जो कोणी या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा मंडळाच्या कोणत्याही योजनेचे किंवा कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील आणि जो कोणी मंडळाला खोटे निवेदन सादर करील किंवा खोटा पुरावा देईल, तो तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाच्या शिक्षेस आणि तसेच दंडास पात्र होईल. विवक्षित अपराधाबद्दल शास्ती.

(२) मंडळाकडून याबाबत प्राधिकृत करण्यात येईल अशा मंडळाच्या सचिवाच्या किंवा अशा कोणत्याही अन्य अधिकाऱ्याच्या लेखी तक्रारीशिवाय कोणतेही न्यायालय, पोट-कलम (१) खालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

२५. (१) या अधिनियमाखालील शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध निर्देशिलेल्या उपक्रमाने केलेला असेल तर, असा अपराध घडण्याच्या वेळी निर्देशिलेल्या उपक्रमाचे कामकाज चालविण्यासाठी जी त्या निर्देशिलेल्या उपक्रमाची प्रभारी होती आणि त्यासाठी जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल : निर्देशिलेल्या उपक्रमाने केलेले अपराध.

परंतु, असा अपराध आपल्या न कळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे अशा कोणत्याही व्यक्तीने, सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही मजकुरामुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध एखाद्या निर्देशलेल्या उपक्रमाने केला असेल आणि त्या निर्देशिलेल्या उपक्रमाच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल व त्यानुसार त्यास शिक्षा देण्यात येईल.

२६. (१) या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्यासाठी राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम तयार करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

१०:३२२
४०४



(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्यांहून अधिक अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्यामध्ये अशा प्रकारे तो ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन, समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

२७. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, शासनास अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी आदेशाद्वारे करता येतील :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

सन २००० चा महा. अध्या. क्र. २८ याचे निरसन व व्यावृत्ती.

२८. (१) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर तरतुदी) अध्यादेश, २००० हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००० चा महा. अध्या. २८.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा करण्याचे योजलेली कोणतीही कार्यवाही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये, करण्यात आलेली कृती किंवा यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची एक

[कलम २ (थ) पहा.]

### राज्य सार्वजनिक उपक्रमांची यादी

**(अ) कंपनी कायदा, १९५६ याखाली स्थापन झालेले उपक्रम.**

१. महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, मर्यादित.
२. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, मर्यादित.
३. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, मर्यादित.
४. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, मर्यादित.
५. कोकण विकास महामंडळ, मर्यादित.
६. विदर्भ विकास महामंडळ, मर्यादित.
७. मराठवाडा विकास महामंडळ, मर्यादित.
८. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ, मर्यादित.
९. महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ, मर्यादित.
१०. मॅफको, मर्यादित.
११. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मर्यादित.
१२. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ, मर्यादित.
१३. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मर्यादित.

१४. महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मर्यादित.

१५. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्यादित.

१६. महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, मर्यादित.

१७. महाराष्ट्र भू-विकास महामंडळ, मर्यादित.

१८. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मर्यादित.

१९. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, मर्यादित.

२०. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मर्यादित.

२१. महिला आर्थिक विकास महामंडळ, मर्यादित.

२२. सिडको, मर्यादित.

२३. हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळ, मर्यादित.

२४. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, मर्यादित.

२५. महाराष्ट्र वन विकास महामंडळ, मर्यादित.

२६. महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मर्यादित.

२७. वसंतराव नाईक विमुक्त जमाती, भटक्या जाती विकास महामंडळ, मर्यादित.

२८. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्यादित.

२९. कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, मर्यादित.

३०. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, मर्यादित.

३१. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित.

३२. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ, मर्यादित.

३३. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मर्यादित.

३४. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मर्यादित.

३५. महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ, मर्यादित.

३६. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, मर्यादित.

**(ब) महाराष्ट्र अधिनियमांखाली स्थापन झालेले उपक्रम–**

३७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

३८. महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ.

३९. महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ.

४०. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ.

४१. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ.

४२. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ.

४३. तापी पाटबंधारे विकास महामंडळ.

४४. गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ.

४५. महाराष्ट्र सागरी मंडळ.

४६. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण.

४७. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

४८. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

**(क) भारत सरकारच्या अधिनियमांखाली स्थापन झालेले उपक्रम–**

४९. महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळ.

५०. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ.

५१. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ.

५२. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

५३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.

**(ड) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० या खाली नोंदविलेले उपक्रम–**

५४. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित.

५५. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित.

५६. महाराष्ट्र राज्य सहकारी हातमाग महासंघ मर्यादित.

५७. महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित.

५८. महाराष्ट्र राज्य तेलबिया उत्पादक महासंघ मर्यादित.

**(इ) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० या खाली नोंदविलेले उपक्रम–**

५९. हाफकिन प्रशिक्षण, संशोधन आणि चाचणी संस्था.

६०. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण.

## अनुसूची दोन

[कलमे ४ (७) व ६ (२) पहा]

### एकनिष्ठता व गुप्तता याबाबतचे प्रतिज्ञापन.

मी, .............................. याद्वारे असे घोषित करीत आहे की, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळाचा अध्यक्ष/सदस्य/इतर अधिकारी किंवा कर्मचारी या नात्याने माझ्याकडून अपेक्षित असलेली आणि उक्त मंडळातील किंवा त्यांच्याशी संबंधित असे मी धारण केलेले पद किंवा दर्जा यांच्याशी योग्य रीतीने संबंधित असलेली कर्तव्ये मी निष्ठापूर्वक, रास्तपणे आणि माझे सर्वोत्कृष्ठ कौशल्य व क्षमता यानुसार करीन व पार पाडीन.

मी आणखी असे घोषित करीत आहे की, मंडळाच्या कामाशी संबंधित कोणतीही माहिती, त्यासाठी कायदेशीरपणे हक्कदार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला मी सांगणार नाही किंवा सांगण्याची मुभा देणार नाही, तसेच, मंडळाशी संबंधित असलेली किंवा त्याच्या ताब्यात असलेली कोणतीही पुस्तके किंवा दस्तऐवज किंवा उक्त मंडळाबरोबर कोणताही व्यवहार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचे कामकाज याची तपासणी करण्यास किंवा ते पहाण्यास अशा कोणत्याही व्यक्तीला मी मुभा देणार नाही.

माझ्यासमोर

स्वाक्षरी.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई